# यशअपयश

ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आयुष्याच्या वाटचालीत ह्यांचा महत्वाचा वाटा असतो. यशानी हुरळून जायचं नाही अन् अपयशानं खचायचं नाही तरच जीवन सुसह्य होतं. नेहमीच यश आपल्याबाजूनी राहील असं नसतं. थोडक्यात यश आपली ओळख जगाला करून देतं तर अपयश जगाशी आपली ओळख करून देतं. म्हणजेच अपयशही आपल्याला बरंच काही शिकवून जातं असतं.

जिवनात यशापयशाचे पारडे नेहमी वर खाली होत असतं. यशाची नशा नको न अपयशाची दशा सुद्धा नको तर संयमानी सगळं साधलं जातं आणि मानवी स्वभावाला ते साधलही!

यशासाठी जिद्द, चिकाटी, प्रयत्नशीलता, प्रामाणिकता, आणि मुख्य म्हणजे स्वतः वर विश्वास ह्या गोष्टी आवश्यक आहेत. सहज आणि फुकट या जगात काहीच मिळत नाही आणि चुकून मिळालंच तर ते टिकत नाही. सगळीच स्वप्न पूर्ण होत नसतात पण म्हणून स्वप्नच बघायची टाळायचं नसतं. त्यात रंगही भरायचा असतो. पण स्वप्न पूर्ण होत नाही म्हणून दुःखी व्हायचं नसतं. आणि रंग उडाले म्हणून चित्रही फाडायचं नसतं एवढं लक्षात ठेवा.

ह्या यशापयशामुळे जीवनातील विविध कंगोरे तुम्हाला अनुभवायला मिळतात जे कि जन्मभर तुम्ही विसरत नाही. आणि ते गृहीत धरूनच मग यशाची एकेक पायरी उंच चढू शकता. हे लक्षात ठेवा.

प्रा. उज्वला श्रीराम प्रमुणे
स्टेट बँक कॉलनी
अमरावती